**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**शनिवार दिनांक २९ नोव्हेंबर २०२५**

**ठळक बातम्या**

1. **छत्तीसगडमधे रायपूर इथं आयोजित करण्यात आलेल्या पोलीस महासंचालक आणि पोलीस महानिरीक्षकांच्या परिषदेत पंतप्रधानांचा सहभाग.**
2. **नागरी हवाई वाहतूक महासंचालनालयानं एअरबस ए३२० प्रकारातल्या सर्व विमानांचे उड्डाण रोखण्याचे आदेश तात्काळ केले लागू.**
3. **साहित्यिक शब्दसृष्टीचे ईश्वर असल्याचे सरसंघचालक डॉ.मोहन भागवत यांचे प्रतिपादन; नागपूर पुस्तक महोत्सवामध्ये 'भारत बोध' सत्रात साधला युवा लेखकांशी संवाद.**
4. **दरेकसा दलमच्या 11 जहाल नक्षलवाद्यांची गोंदिया पोलिसांकडे शरणागती.**

**पोलीस महानिरीक्षकांच्या परिषद**

छत्तीसगडमधे रायपूर इथं आयोजित करण्यात आलेल्या पोलिस महासंचालक आणि पोलीस महानिरीक्षकांच्या परिषदेला पंतप्रधान नरेंद्र मोदी आज आणि उद्या उपस्थित राहणार आहेत. परिषदेच्या विविध सत्रांचे अध्यक्षस्थान ते भूषवतील तसंच विशिष्ट सेवेसाठीची राष्ट्रपती पोलिस पदकं विजेत्यांना  प्रदान करतील. तीन दिवस चालणाऱ्या या परिषदेचं उद्घाटन केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या हस्ते काल झालं. दरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली गेल्या सात वर्षांत केंद्र सरकारने संरक्षक भिंतीच्या संरक्षणातील 586 पोलीस ठाणी बांधून सुरक्षा जाळे मजबूत केले आहे. परिणामी, नक्षलग्रस्त जिल्ह्यांची संख्या 2014 मधील 126 वरून आज केवळ 11 वर आली आहे. पुढील पोलिस महासंचालक / पोलिस महानिरीक्षक परिषदेपूर्वी देश नक्षलवादाच्या समस्येतून पूर्णपणे मुक्त होईल, असा विश्वास केंद्रीय गृह मंत्री अमित शाह यांनी काल परिषदेच्या उद्घाटन प्रसंगी व्यक्त केला.

**मन की बात**

पंतप्रधान नरेंद्र मोदी उद्या रविवारी सकाळी ११ वाजता आकाशवाणीवरच्या मन की बात या कार्यक्रमातून देशवासियांशी संवाद साधणार आहेत. या मालिकेचा हा १२८वा भाग असेल. हा कार्यक्रम आकाशवाणी आणि दूरदर्शन नेटवर्क, वेबसाइट तसंच न्यूज ऑन एयर मोबाइल ॲपवर प्रसारित केला जाईल.

**विमानसेवा**

एअरबस कंपनीच्या ए-३२० मालिकेतल्या विमानांमध्ये सौर किरणोत्सर्गाच्या संभाव्य धोक्याची समस्या निर्माण झाली आहे. यामुळे उड्डाणांच्या नियंत्रणासंबंधीच्या डेटावर परिणाम होऊ शकतो. यामुळे एअरबसच्या सॉफ्टवेअरचे तात्काळ अद्ययावतीकरण करण्यात येत आहे. या प्रकारच्या विमानाला झालेल्या अपघातानंतर एअरबसनं हा आदेश जारी केला. देशात नागरी हवाई वाहतूक महासंचालनालयानं एअरबस ए३२० प्रकारातल्या सर्व विमानांचे उड्डाण रोखण्याचे आदेश तात्काळ लागू केले आहेत. भारतातील अनेक विमान कंपन्यांच्या उड्डाणांवर याचा परिणाम होणार आहे. प्रवाशांनी त्यांच्या उड्डाणाविषयीची अद्ययावत माहिती कंपनीच्या संकेत स्थळावर तपासावी असं आवाहन विमान कंपन्यांनी केले आहे.

**डॉ.मोहन भागवत**

साहित्य सृजनता हा लेखकांचा स्वभावधर्म आहे. ते शब्दसृष्टीचे ईश्वर आहेत. शब्दाचा वापर त्यांनी चुकीचा केला तर त्याचे परिणाम उलट होतात. म्हणूनच, लेखक जे लिहितात ते समाजहितकारीच असावे, ही श्रद्धा आजही कायम आहे आणि त्यामुळेच मी त्या सर्व मानवहितकारी लेखकांना कृतज्ञतापूर्वक अभिवादन करतो, असे प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ.मोहन भागवत यांनी केले. आपल्याकडील भाव कुठल्याही ' इझम ' मध्ये बंदिस्त नाही असे सांगून त्यांनी राष्ट्रीयतेचे महत्व अधोरेखित केले.

***तो भाई एक मत को मान लिया तो बाकी सब मत उनके लिए बेकार है पर सभी नहीं होना चाहिए तो अपना मत बंद कर लिया उसको कहा उन्होंने इजम तो हमारे राष्ट्र को क्या कहना, उनकी समझ में नहीं आया तो उसके जैसा क्या है नेशन तो नेशन बना दिया तो नैशनलिज़म हो गया। अब हम अपने शब्दों को तो नहीं जानते उनके शब्दों को जानते हैं तो उन्होंने राष्ट्र को नेशन बना दिया। हम नेशन गए थे और नैशनलिज़म कहते हैं, भाई हमारे राष्ट्र यह बात का विषय है ही नहीं, अपना राष्ट्र है, प्राचीन काल से है चल रहा है, हम राष्ट्रीयता कहते नैशनलिटी कहते हैं, नैशनलिज़म नहीं है नेशनहुड कह सकते है राष्ट्रत्व हो सकता है.***

नॅशनल बुक ट्रस्ट (एनबीटी) इंडियाच्यावतीने रेशीमबाग मैदानावर नऊ दिवसीय ‘नागपूर पुस्तक महोत्सव 2025’ सुरू आहे. या महोत्सवाच्या आज नवव्या दिवशी 'भारत बोध: युवा लेखक संवाद' चे आयोजन करण्यात आले होते. या सत्राला ते संबोधित करत होते. महाराष्ट्रासह देशातील विविध भागातून आलेल्या सुमारे 300 युवा लेखकांचा या सत्रात सहभाग होता. आपल्याकडील भाव कुठल्याही 'इझम' मध्ये बंदिस्त नाही. म्हणूनच राष्ट्र हा आपल्यासाठी वादाचा विषय कधीच ठरत नाही. स्टेट, सत्ता, विजेता, गुलामी या सगळ्यांपूर्वीपासून आपले राष्ट्र होतेच. ही बाब लक्षात घेऊन मूळ अभ्यास आणि अनुभूती घेऊनच साहित्याचे सृजन करा, आपले साहित्य मानवाला घडवणारे असू द्या, जनकल्याणाचा भाव त्यात असू द्या, असे आवाहन डॉ.मोहन भागवत यांनी यावेळी केले.

**आत्मसमर्पण**

नक्षल संघटनेतला वरिष्ठ नेता अनंत उर्फ विनोद साय्यणा याच्यासह ११ नक्षली अतिरेक्यांनी काल गोंदिया पोलिसांसमोर आत्मसमर्पण केलं. यामुळं नक्षल चळवळीला मोठा हादरा बसला आहे. हे सर्वजण दरेकसा दलम या नक्षल गटाचे सदस्य होते असं गडचिरोली रेंज चे पोलीस उपमहानिरीक्षक अंकित गोयल यांनी सांगितलं. यावेळी पोलिसांनी नक्षलवाद्यांकडून मोठ्या प्रमाणात शस्त्रसाठाही जप्त केला आहे. या सर्व नक्षलवाद्यांवर सरकारनं 89 लाख रुपयांचं बक्षीस जाहीर केलं होतं. गेल्याच आठवड्यात शरणागतीसाठी मुदत मागणारं पत्र अनंत ने महाराष्ट्रासह ३ नक्षलग्रस्त राज्यांच्या मुख्यमंत्र्यांना लिहीलं होतं.

**प्रचारसभा**

राज्यातल्या २४३ नगरपरिषदा आणि ४२ नगरपंचायतींच्या निवडणुकीसाठी राज्यभरात सर्वपक्षीय नेते आणि कार्यकर्ते आपापल्या उमेदवारांचा प्रचार करत आहेत. मुख्यमंत्री आणि भाजप नेते देवेंद्र फडणवीस यांनी आज गडचिरोली येथे नगर परिषद निवडणुकीसाठी प्रचारसभा घेतली. गडचिरोली

नगर परिषदेवर भाजपची सत्ता आल्यास शहराला स्मार्ट सिटी बनवू, असे आश्वासन फडणवीस यांनी दिले.

यापूर्वी गडचिरोलीत आठशे कोटी रुपयांची कामं केली. गडचिरोली शहरात आऊटर रिंग रोड निर्माण करुन लवकरच येथे विमानतळ निर्मितीचं काम सुरु करणार असल्याचं मुख्यमंत्र्यांनी आश्वस्त केलं. दोन डिसेंबरला नगरपरिषद आणि नगरपंचायतीची निवडणूक होणार असून एक डिसेंबरला रात्री दहा वाजेपर्यंत उमेदवारांना प्रचार करता येणार आहे. काही वेळापूर्वी त्यांची भंडारा जिल्ह्यात तुमसर इथं सभा झाली त्यानंतर आता गोंदिया जिल्ह्यात ते प्रचारसभा घेतील.

**मोफत कृत्रिम अवयव**

राज्यात दिव्यांग व्यक्तींना सन्मानाने आयुष्य जगण्यासाठी सर्व सुविधा मिळवून देण्याकरिता शासनाचे सर्वतोपरी प्रयत्न आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकाराने आणि रतननिधी फाऊंडेशनतर्फे महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांमध्ये दिव्यांग व्यक्तींसाठी मोफत कृत्रिम अवयव आणि सहाय्यक साधन वितरण शिबिरे आयोजित करण्यात येत आहेत. या उपक्रमाद्वारे १ लाख दिव्यांग व्यक्तींना लाभ देण्याचे लक्ष्य निश्चित करण्यात आले असून, स्वयंसेवी संस्थांच्या सहकार्याने त्यासाठी अधिक प्रभावी कार्यवाही केली जात आहे . कृत्रिम हात, पाय, श्रवणयंत्रे, व्हीलचेअर्स आणि इतर सहाय्यक उपकरणे यांचा समावेश असलेला हा वितरण कार्यक्रम राज्यातील विविध जिल्ह्यांमध्ये टप्प्याटप्प्याने राबविण्यात येत आहे. रतननिधी फाऊंडेशनने राज्यातील बीड, चंद्रपूर, जळगाव, सोलापूर, पालघर, मुंबई, गडचिरोली, पुणे, सातारा, कोल्हापूर, रायगड, लातूर, नांदेड, यवतमाळ, अकोला, परभणी, छत्रपती संभाजीनगर, धाराशिव आणि ठाणे या जिल्ह्यांमध्ये २९,४९६ सहाय्यक साधनांचे (जयपूर फूट, पोलिओ कॅलिपर्स, कृत्रिम हात आणि काठी याचे वितरण करून सुमारे २६ हजार दिव्यांग व्यक्तींचे पुनर्वसन केले आहे.

**हवामान**

विदर्भामध्ये सर्वात कमी तापमानाची नोंद ही भंडारा येथे 10 अंश सेल्सिअस करण्यात आली असून नागपूरच किमान तापमान 11 अंश सेल्सिअस तर कमाल तापमान 28. पूर्णांक 4 अंश सेल्सिअस होतं.

**क्रिकेट**

भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील तीन सामन्यांची एकदिवसीय मालिका उद्या रविवारपासून झारखंडच्या रांची येथे सुरू होत आहे. भारताचे दोन आघाडीचे क्रिकेटपटू रोहित शर्मा आणि विराट कोहली दोघेही सध्या फक्त एकदिवसीय सामन्यांमध्ये खेळतात आणि ही मालिका २०२७ च्या विश्वचषकासाठी त्यांचे संघातील स्थान मजबूत करण्याची संधी म्हणून पाहिली जात आहे. कसोटी मालिका जिंकल्यानंतर दक्षिण आफ्रिका एकदिवसीय सामन्यांमध्ये त्यांची लय कायम ठेवण्यासाठी आतुर असणार आहे. वेगवान गोलंदाज कागिसो रबाडा आणि अँरिच नॉर्टजे खेळणार नसले तरी, यामुळे जेराल्ड कोएत्झी आणि नांद्रे बर्गर यांना जबाबदारी घेण्याची संधी मिळू शकते. फिरकी गोलंदाजीत केशव महाराज स्लो पिचवर महत्त्वाची भूमिका बजावतील. फलंदाजीत, डी कॉक, बावुमा, ब्रेव्हिस आणि ब्रीट्झके हे संघाचे मजबूत दावेदार आहेत.

*****